लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू
पृष्ठे: १२+६+१२+४ = ३४, किंमत: ₹ ४.००
मुंबई, गुरुवार, दि. १० ऑक्टोबर २०१३



# होरपळलेल्या रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया

## एनबीसीचा उपक्रम : रोटरी क्लबचे सहकार्य

मुंबई : आगीत होरपळलेल्या रुग्णांवर वेळेत उपचार न झाल्याने त्यांचा मृत्यू होतो. अथवा शरीरावरील त्वचा विद्रूप होते. त्यांची त्वचा पूर्ववत व्हावी आणि पुरेशा आरोग्याच्या सेवा-सुविधा प्राप्त व्हाव्यात म्हणून नॅशनल बर्न्स सेंटर सरसावले आहे. सेंटरच्या वतीने ९-१० नोव्हेंबर रोजी रुग्णांसाठी 'ऑपरेशन रीस्टोअर' मोहीम हाती घेण्यात आली आहे. या माध्यमातून आगीत होरपळलेल्या रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. या मोहिमेला रोटरी क्लबचेही सहकार्य मिळाले आहे.

सेंटरच्या म्हणण्यानुसार, दिवसाला आगीच्या दुर्घटनांमध्ये शंभर जण होरपळतात. यामध्ये अनेकांचा मृत्यू होतो. शिवाय रुग्णालयात आगीत होरपळलेल्या जखमींवर करण्यात येणाऱ्या उपचारासाठीचा खर्चही महागडा असतो. परिणामी तो परवडत नाही. शिवाय आगीच्या दुर्घटनांमधून एखादी व्यक्ती बचावली तरी तिला व्यंगाला सामोरे जावे लागते. अशा घटनांमधील रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यासाठी 'ऑपरेशन रीस्टोअर' ही मोहीम हाती घेण्यात आली आहे.

हे अभियान भारतात घेण्यात येत असून, गतवर्षीचे अभियान दहा दिवस चालवले होते. शिवाय यापूर्वी केरळ आणि चंदिगढ येथे घेतलेल्या मोहिमेच्या माध्यमातून दोनशेहून अधिक रुग्णांवर उपचार केले. अभियानांतर्गत आरोग्याच्या सुविधा मोफत पुरवितात. रुग्णांवरील शस्त्रक्रियेसाठी तज्ज्ञ डॉक्टरांची मदत घेण्यात येते. रोटरी क्लब आणि नॅशनल बर्न्स सेंटर 'त्वचा दाना'बाबत जनजागृती करत असून, २२-२३ फेब्रुवारी २०१४ ला शिबिर आयोजित करण्यात येणार आहे. (प्रतिनिधी)

### शिबिरांचे आयोजन

- शिवाय नोव्हेंबर महिन्यातील प्रत्येक मंगळवारसह शुक्रवारी दुपारी १ ते ३ या वेळेत हे शिबिर ऐरोली येथील सेक्टर १३ मधील नॅशनल बर्न्स सेंटरमध्ये घेण्यात येणार आहे.
- यासंदर्भातील अधिक माहितीसाठी इच्छुकांनी डॉ. शिल्पा कर्णिक यांच्याशी ०२२-२७७९३३३३, विष्णू कामत यांच्याशी ९८२०२८१०६८, पूजा पुरी यांच्याशी ९८१९११८८०० आणि प्रदीप पुजारी यांच्याशी ९९६९२६४३९८ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन सेंटरच्या वतीने करण्यात आले आहे.